# सेवक वार्ता

सप्टेंबर-२०२१ वर्ष -२, अंक-११

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणे | कार्यालय - ब-८, सारस नगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे - २


## श्री. वसंत जोशी विशेषांक

### सेवकचा सोनेरी पिंपळ - श्री. वसंत सिताराम जोशी

- वि. त्र्यं. पत्की

दि. २८ ऑगस्ट १९३७ रोजी मध्य प्रदेश राज्यातील इंदोर येथे श्री. वसंत सिताराम जोशी या सोनेरी पिंपळाच्या रोपाची रुजवात झाली. त्यांचे शालेय शिक्षण पुण्यातील भावे स्कूल व मुंबईच्या टिळक पार्ले विद्यालयात सन १९४३ ते १९५४ कालावधीत झाले. त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून शास्त्र शाखेची पदवी १९५८ साली प्राप्त केली. त्यानंतर वानिकीचे दोन वर्षे कालावधीचे प्रशिक्षण १९५९-६१ या कालावधीत कोईमतूर येथे पूर्ण करून त्यांनी वन विभागात वन क्षेत्रपाल पदावर शासकीय सेवेस सुरूवात केली. त्यांनी करवीर औरंगाबाद, अजंठा, पुणे वनक्षेत्रात प्रादेशिक कार्यभार भूषविला. तसेच वन संवर्धन आणि वन उपयोगिता कक्षात तांत्रिक सहाय्यक पदावर आपल्या कार्याची छाप पाडली. पदोन्नतीवर वनविकास महामंडळात डहाणू प्रकल्प विभागात आणि वन विभागातील पूर्व व पश्चिम नासिक विभागात सहाय्यक वन संरक्षक पदावर सेवा केली.

वर्ग एकमध्ये पदोन्नतीवर विभागीय व्यवस्थापक,नंदुरबार प्रकल्प विभाग,विभागीय वनअधिकारी, काजू विकास, लांजा आणि वन संशोधन विभाग, पुणे येथे योगदान दिले. नियत वयोमानानुसार ते दि.३१-०८-१९९५ रोजी सेवानिवृत्त झाले.

त्यांचा विवाह सौ.वृंदाताईंशी झाला होता. या दांपत्यास तीन मुले असून ती सर्व सुखाने नांदत आहेत. सौ. वृंदाताईंना ज्ञानेश्वरी पठणाची आणि कृष्ण भक्तीची प्रचंड आवड होती. त्यांना दि. १४-११-२००९ रोजी अकाली देवाज्ञा झाली आणि श्री. जोशी साहेबांच्या एकाकी जीवनाची आणि अध्यात्माची वाटचाल सुरू झाली.

नंदुरबार येथील सागाची रोपवने आणि लांजा तालुक्यातील काजूची डौलदार कलमे त्यांच्या कार्याची साक्ष आजही देत आहेत. सेवानि वृत्तीनंतर त्यांनी सेवकच्या स्थापनेपासून ते आजतागायत सर्व कार्यात स्व:तास वाहून घेतले आहे. त्यांची कामाची शिस्त,उरक, टापटीप, सचोटी, वक्तशीरता, पाठपुरावा रीत तरुणांना लाजवील अशी आहे. म्हणून त्यांना सेवकची चेतना किंवा सोनेरी पिंपळ उपमा देणे सार्थ होईल.निसर्गवाणी हे सेवकचे नियतकालीक २००४ ते २००७ त्यांनी नियमीत संपादन केले. ॲग्रोवनकरिता साहीत्य लिखाण, वनप्रेमी वार्तापत्रासाठी योगदान, इंडियन फॉरेस्टरमध्ये साग रोपवनावर अभ्यासपूर्ण लेख प्रकाशीत करून ब्रँडीस अवॉर्ड प्राप्त करण्याचा बहुमान त्यांनी मिळविला.

अध्यात्मिक क्षेत्रात आजची ज्ञानेश्वरी, आजची भगवदगीता, योग विद्या व प्रभाव, श्रीमद भगवान- खंड १० व ११, ही बहुभाषिक पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. त्यांच्या या अतुलनीय कार्याची वेळोवेळी पुणेकरांनी वाहवा करून सत्काराची पावती दिली आहे. वनसेवा आणि जनसेवा हे त्याचे ब्रीद आहे.


आपल्या यशाचे श्रेय ते ईश्वराचे अस्तित्व व त्याचा आशिर्वाद यांना देतात. एक आदरणीय, वंदनीय, ज्ञानी व्यक्ती आता सेवकच्या दैनंदिन कार्यातून निवृत्त होत आहे. त्यांची पोकळी भरुन काढणे शक्य नाही. ईश्वर त्यांना दीर्घायु प्रदान करो आणि त्यांची कृपा सदैव आमचेवर असो, ही प्रार्थना.

**या अंकात . . . .**


कै.माधव गोगटे प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम ------ - २
सेवक संघ, उपविधीची ओळख -- ४
सेवक संघ विशेष वृत्त -- ४
वन विषयक व्याख्यानमाला -- ४


---

श्री. वसंत सिताराम जोशी साहेब यांनी भागवत गीतेचे इंग्रजीत भाषांतर Shrimad Bhagavatam Vol. X & XI या ग्रंथरूपात केले. त्याचे प्रकाशन दिनांक ११ सप्टेंबर २०२१ रोजी डॉ. विजय भटकर, संगणक तज्ञ यांचे हस्ते व श्री. विश्वनाथ
क-हाड यांचे उपस्थितीत करणे आले. त्याप्रसंगी श्री. जोशी साहेबांनी जीवन सार्थकी लागल्याची भावना व्यक्त केली.




श्री. वसंत जोशी साहेबांचे सेवक संघ, महाराष्ट्रचे केंद्रीय, वन वृत्त

स्तरीय कार्यकारी मंडळे व सर्व सदस्य तर्फे हार्दिक अभिनंदन

## शारदा ज्ञानपीठमतर्फे सत्कार

ऋषीपूजनानिमित्त पंडित वसंतराव गाडगीळ यांच्या शारदा ज्ञान पीठमतर्फे श्री. वसंत जोशी, श्री जुलिओ रिबेरो, डॉ. माधव गाडगीळ इत्यादी अकरा जणांचा सत्कार दिनांक ११ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ११ वाजता भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मदिर, पुणे येथे डॉ. विजय भटकर, संगणक तज्ञ व डॉ. विश्वनाथ कराड शिक्षणतज्ञ यांचे उपस्थितीत साजरा करण्यात आला .सदर कार्यक्रमास श्री. वसंत जोशी साहेब, प्रकृती अस्वास्थ्यामुळे हजर राहू शकले नाही.



सबब, पंडित गाडगीळ यांनी घरी येऊन श्री. वसंत जोशी साहेबांना पुरस्कार सन्मान चिन्ह प्रदान केले.सेवक संघाला ह्याचा अभिमान आहे. श्री. वसंत जोशी यांनी सतत २५ वर्षे सेवक संघाचे विविध पदाचे काम सांभाळून अविरतपणे मार्गदर्शन केले.

## श्री. वसंत जोशी सेवक संघ कार्यभारातून मुक्त

शेवटच्या काळात ते सेवक संघाचे विश्वस्त होते. दि.१२ सप्टेंबर २०२१ रोजी वयाच्या ८५व्या वर्षी त्यांनी विश्वस्त पदाचे कार्यभारातून मुक्तता घेतली. श्री. वसंत जोशी साहेबांचे नाव त्यांनी सेवक संघास दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल सेवक संघाचे इतिहासात सुवर्ण अक्षरात लिहले गेले आहे.

**११ सप्टेंबर - राष्ट्रीय वन शहिद दिनानिमित्त वने व वन्यजीव यांच्या संरक्षणासाठी स्वताचे प्राणाचे बलिदान देणा-या शहिदांना सेवक संघ, महाराष्ट्रचे सर्व सदस्यांतर्फे त्रिवार अभिवादन.**





## श्री वसंतराव जोशी संत साहित्यातील योगदान

वन विभागात ३४ वर्षे सेवा करून निवृत्तीनंतर श्री. वसंत जोशी यांनी महाराष्ट्राच्या संत साहित्य मध्ये फार आगळे व मोठे योगदान दिले आहे. मराठी संत साहित्यातील विविध ग्रंथांचे इंग्रजीमध्ये भाषांतर करून वाचनासाठी उपलब्ध करून देण्याचे व त्यांनी जागतिक पातळीवर नेण्याचे मोठे मौलिक योगदान दिले आहे. श्री. जोशी यांनी खऱ्या अर्थाने आपले सेवानिवृत्ती नंतरचे जीवन सार्थकी लावले आहे. असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. त्यामध्ये त्यांना डॉ.विजय भटकर संगणक तज्ञ व श्री. त्र्यंबक चव्हाण सेवानिवृत्त सहायक वन संरक्षक यांनी मोलाची साथ दिली आहे.

श्री. जोशी यांचे संत साहित्यातील योगदान तपशील खालीलप्रमाणे

(१) "साधुबोध" ह्या त्यांच्या १००० प्रश्नोत्तररुपी प्रबोधनकारक अशा ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद "Sage's Wisdom" नावाने तयार केला व तो डॉ. विजय भटकर यांच्या मल्टीव्हर्सीटी प्रकाशनातर्फे प्रसिद्ध करण्यात आला आहे.

(२)संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराजांच्या भगवतगीतेच्या ७०० श्लोकांवर आधारीत असलेल्या बाराव्या शतकातील ९०३२ ओव्यांच्या ज्ञानेश्वरी भावार्थदीपिका ह्या असामान्य ग्रंथाचे श्री.त्र्यंबक चव्हाण यांनी "आजची ज्ञानेश्वरी" हे मराठी ओवीबद्ध स्वरूपातील पुस्तक लिहीले. ज्ञानेश्वरीमधील भगवद गीतेचा भाग अलग करून Bhagavat Gita Today या नावाने हा इंग्रजी अनुवाद श्री. जोशी यांनी तयार केला. या ग्रंथाचे संपादन डॉ. विजय भटकर यांनी केले.

(३) "योगप्रभाव" हे पुस्तक महर्षी पातंजल यांच्या योगसूत्र-साधनापाद मधील पहिल्या ४४ सुत्रांवर संत गुलाबराव महाराज यांनी केलेले भाष्य आहे. योगप्रभाव या मराठी स्वरूपातील पुस्तक ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद Yoga Influence या नावाने तयार करून प्रकाशित केले.

(४) संत श्री. गुलाबराव महाराज यांच्या गुलाब वाटिका नामक २० मराठीतील पुस्तिकांचे इंग्रजी अनुवाद Sage's Mission या नावाने तयार करून प्रकाशित केले.

(५) भागवत खंड १० व ११ चा अनुवाद करून Shrimad Bhagavatam Volumes X & XI हे इंग्रजी पुस्तक तयार केले.

## कै.माधव गोगटे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित पुस्तक विमोचनासह विविध कार्यक्रमांचे आयोजन

"माधवाची वनयात्रा" पुस्तकाचे विमोचन

सेवानिवृत्त कर्मचारी संघ महाराष्ट्र, वाइल्ड लाईफ रिसर्च ॲन्ड कॉन्झर्वेशन सोसायटी, महाराष्ट्र वृक्षसंवर्धिनी,पुणे व महाराष्ट्र शासन वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने

आयोजित कै. माधव गोगटे माजी प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनी २५-०९-२०२१रोजी श्रीमती माधुरीताई गोगटे यांच्या हस्ते सेवक संघ महाराष्ट्र द्वारा प्रकाशित "माधवाची वनयात्रा" या कै.गोगटे साहेबांच्या आठवणींचे संकलन असलेल्या पुस्तकाचे वन भवन, सभागृह, गोखलेनगर, पुणे येथे हृद्य विमोचन झाले. त्यापेळी सेवक संघ, महाराष्ट्रतर्फे हा कार्यक्रम आयोजित करणेत आला होता. महाराष्ट्र वृक्षसंवर्धिनी संस्थेद्वारा झूमॲपवर देखील या कार्यक्रमाचे प्रसारणाची सोय उपलब्ध केली हाती. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री. मो. ह. खेडकर, सेनि प्रमुवसं, महाराष्ट्र यांनी भूषविले. कार्यक्रमात कै.गोगटे यांचे सुपुत्र डॉ.परीक्षित गोगटे आणि इतर कुटुंबीय, निकटवर्ती, मित्र व सहकारी, प्रत्यक्ष व सहभागी होते. सेवक संघाचे पदाधिकारी सर्वश्री शिरीष अस्थाना, अध्यक्ष, व्ही.टी. पत्की, डॉ.एस. एच. पाटील, व्ही.जी. डावरे, उमेश धोपेश्वरकर यांनी कार्यक्रमाचे उत्तम प्रकारे नियोजन करून तो यशस्वी केला. तसेच वरिष्ठ सेनि.वनाधिकारी सर्वश्री डॉ.ए. के. झा, व्ही. एस. बर्डेकर, अरविंद आपटे, बाबा नाईकडे यांची विशेष उपस्थिती होती. हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पुणे वन विभागाचे मोलाचे सहकार्य मिळाले.

या पुस्तकात मराठी व इंग्रजी भाषेतील ४० लेख असून पाने २०४ आहेत. देणगीमूल्य केवळ रु. १५० आहे.

### कै.गोगटे तैलचित्राचे अनावरण


तसेच याप्रसंगी व्ही. एस. बर्डेकर यांनी तयार केलेल्या तैलचित्राचेही अनावरण करण्यात आले.

### श्री. बडवे यांच्या पुस्तकाचे विमोचन

त्याशिवाय, याप्रसंगी श्री. सुभाष बडवे, सेनि वनसंरक्षक यांचेद्वारा लिखित व कॅम्पा अनुदानित Grassland Development for Improved Livelihood या पुस्तकाचे देखील विमोचन करण्यात आले.

### माधव गोगटे स्मृती व्याख्यान मालेचा शुभारंभ

कै.गोगटे सरांचे कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्या प्रसंगी कै. माधव गोगटे स्मृती व्याख्यानमालेचा आरंभ करण्यात आला.श्री.विश्वास सावरकर यांनी Tiger Island & silviculture या विषयावर व्याख्यान मालेत गुंफलेले पहिले पुष्प खूपच अतुलनीय होते. त्यांनी विषय प्रकटीकरणासह सहजसुलभतेने समजावून दिला, त्याची अनेकांनी प्रशंसा केली. या कार्यक्रमाचे संचालन श्री. रामदास गेवारी सवसं यांनी सुबोधरित्या केले तर श्री. विठ्ठल सूर्सवंशी, भावसे आभार मानले.














### कार्यकारी मंडळ बैठक वृत

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या दि.७-९-२०२१ रोजीच्या आभासी बैठकीत खालील विषयावर चर्चा झाली.

(१) कॅम्पा मूल्यांकनाचे आयकर रक्कम रु १८३७०/-आणि सन २०२०-२१ वर्षाचा आयकर भरणा.
(२)कन्हारगाव वन्य. अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा प्रगती.
(३)नवीन आजीवन सदस्य नोंदणी.
(४)कार्यकारी अध्यक्ष सेवक यांना पदत्यागाबाबत मान्यता देणे.
(५) धुळे वनविभागातील पर्यटन विकास आराखडा करणे बाबत.
(६) प्रायोगीक तत्वावर लोक जैविक नोंदवह्यांचे मूल्यांकन करणे.
(७)"माधवाची वनयात्रा" पुस्तकाचे २५-९-२०२१रोजी विमोचन करणे.
(८) सेवक संघाच्या रौप्य महोत्सवी विशेषंकाचे निर्मिती कामाची प्रगती.

(९)रौप्य महोत्सवी विशेष अंकासाठी जाहीराती मिळविणेची प्रगती.
(१०)तोरणमाळ व चारठाणा वन संवर्धन राखीव क्षेत्राचे व्यवस्थापन आराखडे तयार करणे.
(११)श्री. जोशी यांच्या सप्टेंबर २०२१ अखेर सेवकच्या कामातून कार्यमुक्त करण्याबाबत विनंती
(१०)ऐनवेळचे विषय.
या आभासी बैठकीचे सूत्रसंचालन श्री गवळी यांनी केले.

## सेवक संघ,उपविधीची ओळख

### सेवक संघ, महाराष्ट्राचा सुधारीत उपविधी (भाग - ५)

११)पदाधिकारी आणि त्यांचे कार्य:
११.१) अध्यक्ष:
११.१.१)अध्यक्ष प्रत्येक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारतील.
११.१.२)संघाच्या विशेष सभांच्या व त्रैमासिक सभांच्या तारखा, वेळा व स्थान ठरविणे.
११.१.३)संघाच्या हिशोब, कोषाध्यक्ष व कार्यवाहासह नियंत्रण ठेवणे.
११.२)कार्याध्यक्ष: अध्यक्षांना सहाय्य करणे.
११.३)उपाध्यक्ष: अध्यक्षांचे अनुपस्थितीत अध्यक्षांची कामे करणे व अधिकार वापरणे.
११.४.१,२,३,४,५) कार्यवाह:
१.संघाच्या सर्व सभांच्या बैठकीची व्यवस्था करणे, सभासदांना पूर्व सूचना देणे व सभांचे वृत्तांत लिहणे.
२.संघाचे वार्षिक अहवाल व अंदाज पत्रक तयार करणे व कार्यकारी मंडलापुढे ठेवणे.
३. संघाचे पत्रव्यवहार, मिळकत व दप्तर सांभाळणे.
४.अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना संघाच्या विशेष कामासाठी सहाय्य करणे
११.५) सह-कार्यवाह: कार्यवाहांना सहाय्य करणे व त्यांचे अनुपस्थितीत त्यांचा कार्यभार सांभाळणे.
११.६.१,२,३,४,५,६,७) कोषाध्यक्ष: संघास आलेल्या देणग्या व वर्गण्या तसेच इतर निधी जमा करून घेणे व पावत्या देणे.
२.संघाचे हिशोब नियमानुसार ठेवणे.
३.बँक व्यवहार करणे
४. वार्षिक हिशोब, नोंदणीकृत हिशोब तपासनिसाकडून तपासून घेणे व कार्यकारी मंडळास सादर करणे.
५.संघाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे सभासदांच्या वर्गणीसंबंधी पुस्तके ठेवणे.
५.संघाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे सभासदांच्या वर्गणीसंबंधी पुस्तके ठेवणे. जमाखर्चाची माहिती प्रत्येक तीन महिन्यांनी कार्यकारी मंडळास देणे.
६.संघाचे आर्थिक व्यवहार उच्च प्रतीचे राहतील याची व्यवस्था करणे.
७. जर काही कारणास्तव कोषाध्यक्ष पद रिकामे झाले तर त्यांच्या अनुपस्थितीत त्यांची कामे पर्यायी व व्यवस्था होईपर्यन्त संघाचे कार्यवाह पार पाडतील.
१२) संघाच्या मध्यवर्ती व वृत्तस्तरीय कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा:
१२.१) संघाच्या मध्यवर्ती व वृत्त स्तरीय कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यातून किमान एकदा होईल आणि ती पुणे किंवा अन्य वनवृत्ताच्या मुख्यालयाचे ठिकाणी सोयीनुसार घेण्यात येईल.
१२.२) मागणीची सभा: कार्यकारी मंडळाच्या किमान तीन सभासदांच्या सहीने विनंती आल्यास घेता येईल त्यासाठी दोन दिवसांची सुचना कार्यकारी मंडळाच्या सभासदांना दिली जाईल.

## सेवक संघ विशेष वृत्त.

### डॉ.एस.एच. पाटील यांचा सेवक संघ कार्यकारी अध्यक्ष पदाचा राजीनामा

सेवक संघ महाराष्ट्रचे कार्यकारी अध्यक्ष डॉ.एस.एच. पाटील यांची अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ पदावर निवड झाल्याने त्यांनी कार्यकारी अध्यक्ष सेवक संघ पदाचा राजीनामा दिला असून तो अध्यक्ष सेवक संघ यांनी स्विकृत केला आहे.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प बांबू फुलोरा आराखडा काम पूर्ण

सेवक संघ चमूने ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील बांबू फुलोरा पश्चात बांबू निष्कासन व इतर कामांचा अंतिम आराखडा ५ प्रतीत मा. वन संरक्षक व क्षेत्र संचालक चंद्रपूर यांना दि. २०-८-२०२१ ला सादर करून काम पूर्ण केले.

## नवीन आजीवन सदस्य

सेवक संघ धुळे शाखेत खालील आजीवन सदस्यांची नोंदणी झाली. त्यांचे सेवक संघात सहर्ष स्वागत.
(१) श्री. आर.जी. राणे, सेनि सवसं जळगाव
(२) श्री. बी. बी. जोमिवाले, सेनि वपअ जळगाव
(३) डॉ. ए. के. झा, सेनि प्रमुवसं, पुणे.

## वन विषयक व्याख्यानमाला

सेवक संघ धुळे शाखेमार्फत निशुल्क वन विषयक व्याख्यान मालेत श्री. जयप्रकाश पाटील, सेवक संघ धुळे शाखेचे ज्येष्ठ सदस्य व सेनि विभागीय वन अधिकारी यांचे गुगल मीटवर दि.२६-९-२०२१ रोजी "टोपोशिट व वन नकाशे वाचन आणि त्यांचा वापर, महत्व" या विषयावर व्याख्यान झाले. त्याचा लाभ ३८ जणांनी घेतला.

## कन्हारगावअभयारण्य

**आराखडा** कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी सेवक सदस्य व विविध तज्ञांचे सहयोगाने वनस्पती, वन्यप्राणी,पक्षी,फुलपाखरे , किटक इ. क्षेत्रीय सर्वेक्षण यशस्वी रित्या पूर्ण करणेत आले आहे.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी